**Estd 1962**
**Naac 'A++' Grade**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जाहीर आवाहन

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित सर्व विद्यार्थी, पालक व इतर सर्व भागधारक यांना कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च/एप्रिल २०२२ मधील परीक्षापध्दतीना विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांनी मान्यता दिल्याप्रमाणे दि.५ जून २०२२ पासून (महाविद्यालयीन स्तरावरील पारंपारीक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा) सुरळीतपणे सुरु झालेल्या आहेत. विद्यापीठाकडील परीक्षा विभागामार्फत आयोजित करण्यात येणा—या सर्व पारंपारिक अभ्यासक्रमाच्या द्वितीय, तृतीय, चतुर्थ, पाचवे सत्र तसेच पदव्युत्तर स्तरावरील भाग १ व भाग २ व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षांची सुरुवात दि.२५ जून २०२२ पासून होणार आहे. या अनुषंगाने परीक्षा विभागामार्फत सर्व पूर्वतयारी करण्यात आली आहे. सदर परीक्षांच्या अनुषंगाने विद्यापीठ अधिकार मंडळाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे या सर्व परीक्षा कोविड—१९ च्या प्रादुर्भावापूर्वी ज्या प्रचलित पध्दतीने होत होत्या त्याचपध्दतीने ऑफलाईन — वर्णनात्मकपध्दतीने होणार आहेत तसेच नियमित विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक विषयामधील दोन पेपरच्यामध्ये दोन दिवसाचे अंतर ठेवण्यात आले असून प्रती तास १५ मिनिटे याप्रमाणे अधिकचा वेळ देण्यात आला आहे. तसेच सर्व परीक्षेसाठी विद्यार्थ्यांसाठी Question Bank (प्रश्नसंचिका) विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच परीक्षा कालावधीनुसार अन्य विषयाच्याही Question Bank (प्रश्नसंचिका) टप्प्याटप्प्याने उपलब्ध करुन

देण्यात येत आहेत. सबब सर्व भागधारकांना आवाहन करण्यात येते की, परीक्षेसंदर्भातील अधिकृत माहितीसाठी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाचाच वापर करण्यात यावा. परीक्षेविषयक विद्यापीठामार्फत प्रसिध्द करण्यात येणारी परिपत्रके/सूचना/घोषणापत्रके/माहिती विद्यापीठ संकेतस्थळावरीलच अधिकृत समजण्यात यावी. विविध समाज माध्यमाद्वारे चुकीची अथवा अपूर्ण माहिती पाठविली जाण्याची शक्यता असल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होवू शकतो.

सबब, विद्यापीठामार्फत आयोजित केलेल्या परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सर्व घटकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक मा.डॉ. ए.एन.जाधव यांनी केले आहे.